# पालव

आई आजारी म्हणून नितीन कामावरून सुट्टी काढून भारतात आला. डॉक्टर असल्याने कामावरून सुट्टी घेणे अर्थात एवढं सोप्प नव्हतंच. पण तरी आई साठी महिन्याभराची सुट्टी काढली होती त्याने. आईला जसं हळूहळू बरं वाटू लागलं तसं त्याला त्याचं डॉक्टर मन बेचेन करू लागलं. त्याचं काम, त्याचे रुग्ण , डॉक्टर म्हणून असलेल्या जवाबदाऱ्या त्याला शांत बसु देईनात . आई अजून पूर्ण बरी झाली नव्हती पण आईला त्याची बेचैनी दिसत होती. आई त्याला म्हणाली "जा बाबा तू आपल्या कामाला लाग. तुझी अनेकांना गरज आहे. मला पण आता तसं बरं वाटतंय." अमेरिकेत परत निघून जावं एवढी अजून आईची तब्येत बरी नाही हे त्याला जाणवत होतं. परत आपण परदेशात राहतो त्यामुळे आलो आहोत आई साठी, तर आईला बरं वाटल्याशिवाय आता परत जायचं नाही हा निश्चय करूनच तो भारतात आला होता.

त्याने त्याच्या फावल्या वेळात पुण्यातल्या काही हॉस्पिटल्सना भेट द्यायचं ठरवलं. बी. जे . मेडिकल मधूनच शिक्षण झाल्याने अनेक डॉक्टर्स ओळखीचे होतेच. नवजात बालकाचे आरोग्य आणि खास करून नवजात बालकाचे पहिले तीन आठवडे ह्यात त्याचं प्रमुख शिक्षण असल्याने अर्थातच त्याने पहिली भेट ही बालरोग विभागाकडे दिली. भारतात नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण खूप जास्त आहे हे त्याला माहीत होतेच पण आज पण त्यात खुपसा बदल झालेला नाही, हे बघून त्याला खूप वाईट वाटलं. आजही अनेक बाळांचा मृत्यू फक्त बाळांना ऑक्सिजन पुरवण्याचे योग्य उपकरण नसल्याने होतोय हे बघून तर तो अक्षरशः हादरलाच. अमेरिकेत ह्याच मशिन्स फक्त जुन्या झाल्या म्हणून फेकून देण्यात येतात. ह्या साठी काही तरी करायलाच हवं हे पक्कं मनाशी ठरवूनच त्या दिवशी तो घरी आला.

अमेरिकेत परत आल्यावर पण त्याच्या मनात सतत एकच विचार सुरू होता, की भारतात मदत तर करायची आहे पण करायची कशी? नवजात बालकाचं ऑक्सिजनचं मशीन हे खूप महाग असतं. मग प्रथम त्याने तो ज्या हॉस्पिटलमध्ये काम करत होता त्या हॉस्पिटलमध्ये माहिती काढली, की जुन्या फेकलेल्या मशीन्सचं हे लोक नक्की काय करतात आणि त्याला कळलं, की ते ते अक्षरशः ते मशीन रिसायकलसाठी टाकून देतात. मग त्याने अनेकांशी संपर्क साधून, भेटून ते मशीन टाकून द्यायच्या ऐवजी भारतात कसं पाठवता येईल हे शोधून काढलं. आणि पहिलं जुनं मशीन दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला पोहोचलं. पहिल्याच वर्षी पाच बाळांचा जीव त्या मशीनने वाचला आणि नितीनचा आत्मविश्वास वाढत गेला. हे पण जाणवू लागलं, की हे काम तो एकटा नाही करू शकणार. आर्थिकदृष्टया ते शक्यच नव्हतं. त्याच्या मित्रमंडळींच्या मदतीने त्याने काही काळ आर्थिक मदत मिळवून आणखीन थोड्या मशीन्स पाठवल्या आणि अर्थात त्या मशीनने बाळांचे जीव कसे वाचत आहेत हे फोन कॉल्स आणि ई-मेलने अनेक लोक त्याला सांगू लागले आणि अनेकदा असंही झालं, की मशीन मिळाल्यावर त्याचं पुढे काय झालं

हे कळायचंच नाही. एका हॉस्पिटल पासून सुरू झालेलं काम वाढत होतं. अनेक खेड्यांमध्ये कशाचीच सोय नाही आणि तिथे बाळांसाठी व्हेंटीलेटर्स नाहीत असे अनेक गावातले हॉस्पिटल्स होते ज्यात नितीनला खूप काही करावसं वाटत होतं. हे सगळं होणार कसं? इतके पैसे आणणार कुठून? मिळाले तर त्या मशीनचा सदुपयोग होतोय हे कळायचं कसं ?..... अनेक प्रश्न. मशीनने बाळाचा जीव वाचला हे ऐकून जेवढी कामाची स्फूर्ती यायची तेवढीच काही वाईट अनुभव आले की ती जायची.

एकदा त्याने रायपूर जिल्ह्यातल्या एका डॉक्टरला त्यांच्या हॉस्पिटल मध्ये वापरायला एक उपकरण (equipment ) दिलं आणि नंतर त्याला कळले की ते कधी हॉस्पिटल पर्यंत पोहोचलंच नाही. ते उपकरण त्या डॉक्टरने घरीच ठेऊन घेतलं. त्या वेळेला त्याला वाटलं, की हे सगळं आपण का करतो आहोत. स्वतःच्या वेळेची, पैश्यांची गुंतवणूक कितीही केली तरी अमेरिकेत राहून सातत्याने लक्ष देणे आपल्याला जमणार नाही. त्याचं निराश होणं साहजिक होतं. त्याच ट्रिपमध्ये त्याने अनेक डॉक्टर्सशी संपर्क साधला. त्यांची काही मदत होईल असं त्याला वाटत होतं' पण त्यांच्या कडून पण नकारात्मक प्रतिसाद आल्याने त्याचा मूड आणखिनच गेला. ह्या निराशावादी परिस्थितीत त्याला एक फोन आला, धमतरी गावातल्या डॉक्टरचा होता तो फोन. अतिशय आनंदाने ते डॉक्टर सांगत होते, "आज एका बाळाचा जीव तुम्ही दिलेल्या ऑक्सिजन उपकरणामुळे वाचला." .... बघायला गेलं तर बाळाचा जीव एक जुनं उपकरण वापरून वाचवावा लागला, इतकी वाईट परिस्थिती आहे हॉस्पिटल्सची हे जाणवलं पण त्याने दिलेल्या उपकरणामुळे बाळ वाचलं होतं. त्याला परत कामाचा जोश आला. आता हे सगळं का करतो ह्या प्रश्नापेक्षा आता अजून खूप करायचंय आणि कसं करायचं हा प्रश्न त्याला भेडसावू लागला.

त्याची पत्नी त्याला पूर्णपणे साथ देत होती. लागेल ती मदत करत होती पण जेव्हा तिला दिसलं, की वाढत्या कामाबरोबर खर्च पण वाढतोय, तेव्हा मात्र एक संसार करणारी पत्नी म्हणून तिने नितीनला सांगितलं की आता आपल्याला Non-profit organization सुरू करायला हवी; आणि २०१०ला "पालव " ही non-profit organization सुरू झाली.

हळूहळू त्याच्या लक्षात आलं, की नुसतं मशीन देऊन फायदा नाही. बऱ्याच नर्सेसना ते कसं ऑपरेट करायचं ह्याचं शिक्षण देणं पण जरूरी आहे. आणि त्यासाठी त्याला भारतात जाणं जरुरी आहे. त्याच्या भारताच्या चकरा वाढू लागल्या आणि त्याबरोबरच खेड्यांमध्ये परिस्थिती किती वाईट आहे हे आणखीन प्रकर्षाने जाणवू लागलं. एका हॉस्पिटलमध्ये ५० बाळं होती. त्यातल्या १५ बाळांना व्हेंटिलेटरची आवश्यकता होती आणि त्या हॉस्पिटलमध्ये फक्त एक व्हेंटिलेटर उपलब्ध होता. काही हॉस्पिटल्स मधले व्हेंटिलेटर्स कामंच करत नव्हते. अशा अनेक हॉस्पिटल्सना पालव संस्थेने मदत करून अनेक बाळांना जीवदान दिले.

आजपर्यंत पालव संस्थेने अनेक हॉस्पिटल्सना व्हेंटिलेटर्स दिले आहेत. नर्सेस, दाई यांना प्रशिक्षण देण्याचं कामही पालव करते. काही गावांमध्ये बाळांसाठी स्पेशल वॉर्ड्स नव्हते. तिथे

"पालव" ने जमेल तसे स्पेशल वॉर्ड्स बनवले.

आता या कोविडच्या काळात पालव संस्था अनेक हॉस्पिटल्समध्ये मेडिकल मास्क्स, व्हेंटिलेटर्स, बेड्स पुरवते आहे. पुण्यातल्या ससून, भारतीय हॉस्पिटल, ताराचंद हॉस्पिटल इथे आई आणि बाळ यांच्यासाठी वेगळ्याने वॉर्ड तयार करण्यात येत आहेत.

मला स्वतःला या संस्थेचं सगळ्यात जास्त आवडणारं तत्त्व म्हणजे "जेणे करून थेट पैसे/चेक या स्वरूपात दान न देता हॉस्पिटल्समध्ये बाळ आणि आई यांच्यासाठी जे जे करता येईल ते करणे. बाळांचे व्हेंटिलेटर्स, नर्स ट्रेनिंग पासून ते बाळाच्या आजारपणात आई आणि बाळ जवळ जवळ राहावेत अशी सोय पुरवण्यापर्यंत सगळं "पालव संस्था" करते.

दुसरं म्हणजे ह्या संस्थेने आजपर्यंत तरी कधीच मोठ्या मोठ्या कलाकारांना बोलावून त्यांचे कार्यक्रम करून त्यांना त्यांची फी देऊन उरलेले पैसे पालवच्या कामात लावले नाही आहेत. इतक्या चांगल्या कामासाठी मोठ्या कलाकारांची गरज काय? लोकांना पालव संस्थेवर विश्वास असेल तर नक्कीच अनेक मदतीचे हात पुढे येतील. आपण सगळ्यांनी हातभार लावायला हवा. मागच्या वर्षी आमच्याच गावातल्या कलाकारांनी एक अतिशय सुंदर कार्यक्रम करून बरीच देणगी मिळवली. दर वर्षी "पालव संस्था" "Palav walk " असा एक कार्यक्रम करते. त्यात अनेकजण भाग घेतात. आपला व्यायाम आणि दुसऱ्यांना मदत असं दोन्ही होतं. ह्यावेळेस तर कोविडमुळे ग्लोबल वॉक आहे. अधिक माहिती साठी: https://www.palav.org/#work

पालव म्हणजे कोवळी पाने, वेल... ती चढते आहेच. नवजात बाळ हे नवीन पालवी सारखंच असतं. वेळेवर भक्कम आधार मिळाला तर ते सुदृढ होतं. हा आधार आता आपल्याला सगळ्यांना द्यायचाय.

नितीन चौथाई यांनी फार मोठं आणि महत्वाचं काम हाती घेतलंय. या कामात आपला थोडा जरी हातभार लागला तरी अनेक बालकांचे जीव वाचू शकतील. नवी पिढी सुदृढ असायलाच हवी.

- **पल्लवी सप्रे** (डेट्रॉईट, मिशिगन)

